नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ८९ Issue - 89 | वार - रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ Blow- Sunday Date 23 AUGUST 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# देशातील सहा राज्यांमध्ये एलपीजी पाइपलाइनचा विस्तार

## केंद्राकडून ७ हजार कोटींची गुंतवणूक; १,८०० किमी नव्या पाइपलाइनला मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशातील एलपीजी पुरवठा व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू नियामक मंडळाने (पीएनजीआरबी) सुमारे ७,००० कोटी रुपये खर्चाच्या १,८०० किमी लांबीच्या तीन एलपीजी पाइपलाइन प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, उत्तराखंड, कर्नाटक आणि गोवा या सहा राज्यांमधून या पाइपलाइन टाकण्यात येणार आहेत.

सरकारी मालकीच्या गेल इंडिया लिमिटेड कंपनीकडून हे प्रकल्प विकसित केले जाणार आहेत. या विस्तारामुळे पीएनजीआरबीच्या मान्यताप्राप्त एलपीजी पाइपलाइनचे नेटवर्क सध्याच्या सुमारे ७,७०० किमीवरून ९,५०० किमीपर्यंत वाढणार आहे. म्हणजेच एलपीजी पाइपलाइन नेटवर्कमध्ये जवळपास एक चतुर्थांश वाढ होणार आहे. मंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांमध्ये ५५६ किमी लांबीची चेरलापल्ली (तेलंगणा)-नागपूर (महाराष्ट्र) पाइपलाइन, ६११ किमी लांबीची झाशी (उत्तर प्रदेश)-सितारगंज (उत्तराखंड) पाइपलाइन आणि ६३३ किमी लांबीची शिक्रापूर (महाराष्ट्र)-गोवा-हुबळी (कर्नाटक) पाइपलाइन यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे देशातील विविध भागांमध्ये एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर आणि सातत्यपूर्ण पुरवठा करणे सुलभ होणार आहे. सध्या भारताच्या एलपीजी गरजेचा मोठा हिस्सा आयातीद्वारे भागवला जातो. आयात केलेले एलपीजी प्रामुख्याने किनारपट्टीवरील टर्मिनलवर उतरवले जाते. तेथून देशातील विविध वापर केंद्रांपर्यंत त्याची वाहतूक केली जाते.




एलपीजीची लांब पल्ल्याची वाहतूक पाइपलाइनद्वारे करणे तुलनेने सुरक्षित आणि किफायतशीर मानले जाते. सध्या मोठ्या प्रमाणावर एलपीजी टँकरद्वारे रस्ते मार्गाने वाहून नेले जाते. या वाहतुकीदरम्यान झालेल्या गंभीर अपघातांच्या पार्श्वभूमीवर रस्ते वाहतुकीवरील अवलंबित्व कमी करण्यावर नियामकाचा भर आहे. नव्या पाइपलाइनमुळे एलपीजी वाहतुकीची कार्यक्षमता वाढण्यासोबतच अपघातांचा धोका कमी होण्यास मदत होईल. तसेच देशातील एलपीजी वितरण व्यवस्था अधिक विश्वासार्ह आणि मजबूत होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पांकडे सरकारच्या दीर्घकालीन एलपीजी पुरवठा धोरणाचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिले जात आहे. पाइपलाइन नेटवर्कचा विस्तार झाल्याने आयात टर्मिनलपासून देशातील मागणीच्या प्रमुख केंद्रांपर्यंत एलपीजी पोहोचवण्याची क्षमता वाढणार आहे. त्यामुळे वाढती एलपीजी मागणी पूर्ण करण्यासोबतच पुरवठा साखळी अधिक सक्षम करण्यास मदत होणार आहे.

# महाराष्ट्रातील ४ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारासाठी निवड, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मूंच्या हस्ते पुरस्कार वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या देशभरातील ४८ शिक्षकांची राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड झाली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा समावेश आहे. ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.



महाराष्ट्रातील चार मानकरी

डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे - बीड : दिव्यांग, ऊसतोड कामगारांची मुले आणि वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अध्यापन आणि शैक्षणिक अडचणींवर मात करण्यावर भर.

कुंदा जयवंत बच्छाव - नाशिक : नाशिक मनपा शाळा क्रमांक १८चा दर्जा सुधारण्यासाठी 'ज्ञानभिंती', 'आनंदवली शिक्षण कट्टा' आणि अमेरिकेतील शाळांशी 'ई-ट्विनिंग'सारखे अभिनव उपक्रम.

वैभव वसंतराव कुलकर्णी - लातूर : ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा, विज्ञान-तंत्रज्ञान आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर. विद्यार्थ्यांनी विविध स्तरांवर उल्लेखनीय कामगिरी केली.

शिवप्रसाद अरविंद टिंगरे - सातारा : विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण आणि देशसेवेची भावना रुजवण्यासाठी योगदान. छऊव विविध स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन.

तीन टप्प्यांत निवड

पुरस्कारासाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन टप्प्यांत निवड प्रक्रिया झाली. १५ जून ते २० जुलैदरम्यान ऑनलाइन स्व-नामांकन मागवण्यात आले. नावीन्यपूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची प्रगती, व्यक्तिमत्त्व विकास आणि शाळेच्या गुणवत्तावाढीसाठीचे प्रयत्न या निकषांवर अंतिम ४८ शिक्षकांची निवड करण्यात आली.

५ सप्टेंबरला पुरस्कार सोहळा

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवनात होणाऱ्या समारंभात पुरस्कार प्रदान केले जातील. पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या कार्यावर आधारित लघुपटही यावेळी दाखवले जाणार असून कार्यक्रमाचे विविध माध्यमांवर थेट प्रक्षेपण केले जाणार आहे.




# 'वंदे मातरम'च्या जनजागृतीसाठी भाजप राबवणार देशव्यापी मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताचा सन्मान आणि ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी भारतीय जनता पक्षाने शनिवारी एक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केला आहे. या राष्ट्रीय गीताचा इतिहास आणि महत्त्व याबद्दल जनजागृती करण्यासाठी भाजप देशभरात एक विशेष मोहीम राबवणार आहे.

काँग्रेस कार्य समितीने १९३७ मधील आपला जुना ठराव पुन्हा लागू करत काँग्रेसच्या कार्यक्रमांमध्ये 'वंदे मातरम'ची फक्त पहिली दोनच कडवी गाण्याचा निर्णय १९ ऑगस्ट रोजी घेतला होता. काँग्रेसच्या या निर्णयाचा भाजपने तीव्र शब्दांत निषेध केला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या (१५ ऑगस्ट) कार्यक्रमात राष्ट्रीय गीत सुरू असताना काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी यांच्यात संवाद सुरू असल्याचा आरोप भाजपने केला होता. या वादानंतर काँग्रेस कार्य समितीने १९३७ च्या निर्णयाचा हवाला देत पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये केवळ पहिली दोनच कडवी गायली जातील, हे स्पष्ट केले. यावर प्रतिक्रिया देताना भाजपने म्हटले आहे की, 'वंदे मातरम' हा केवळ एका राजकीय पक्षाचा विषय नसून देशाचा गौरव आणि लाखो क्रांतीकारकांच्या बलिदानाचा वारसा आहे. १९४७ मध्ये स्वातंत्र्याचा नारा 'वंदे मातरम' होता आणि २०४७ च्या 'विकसित भारत'चा हुंकारही 'वंदे मातरम'च असेल.

भाजपाच्या ठरावातील प्रमुख मुद्दे:

राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक: भाजपने 'वंदे मातरम'ला भारताचे राष्ट्रीय गीत, भारतमातेबद्दलच्या आदराची अभिव्यक्ती, स्वातंत्र्यलढ्याचा मंत्र आणि राष्ट्रीय जाणिवांचे अमर प्रतीक मानले आहे.

संपूर्ण गीतेला वैधानिक संरक्षण: भाजप पूर्ण सहा कडव्यांच्या 'वंदे मातरम'चा सन्मान आणि गौरव जपण्यासाठी कटिबद्ध आहे. १९५० च्या संविधान सभेच्या घोषणेचा आणि जन गण मनप्रमाणेच 'वंदे मातरम'ला वैधानिक संरक्षण देणाऱ्या २०२६ च्या संसदेच्या कायद्याचा पक्ष पुनरुच्चार करतो.

राजकीय तडजोडीला विरोध: संविधानाचा दर्जा आणि संसदेचा कायदा हा काँग्रेसच्या कार्य समितीपेक्षा सर्वोच्च आहे. त्यामुळे १९३७ ची राजकीय तडजोड ही १९५० चा घटनात्मक निर्णय आणि २०२६ च्या कायद्यापेक्षा मोठी असू शकत नाही, असे ठरावात नमूद केले आहे.

इतिहासाची जनजागृती: मुस्लिम लीगचे आक्षेप आणि जातीय राजकारणामुळे 'वंदे मातरम' मर्यादित करण्याचा जो इतिहास आहे, तो जनतेसमोर आणला जाईल. तसेच महात्मा गांधींनी 'वंदे मातरम'चा उल्लेख साम्राज्यवादाविरुद्धचा नारा आणि शुद्ध राष्ट्रीय भावनेशी जोडलेला मंत्र असा केला होता, हा विचारही लोकांपर्यंत पोहोचवला जाईल.

युवा पिढीसाठी विशेष मोहीम: तरुणांना 'वंदे मातरम'चा इतिहास, अर्थ आणि स्वातंत्र्यलढ्यातील त्याचे योगदान समजून सांगण्यासाठी देशभरात जनजागृती मोहीम राबवली जाईल.

## नवी मुंबईत 'कॅम्पस कनेक्ट' मोहिमेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## नवी मुंबई पोलिसांच्या 'प्रहारी' इंटिग्रेटेड सीसीटीव्ही कमांड सेंटरचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

# व्यसनांपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी शिक्षण, क्रीडा, कौशल्य विकास आणि राष्ट्र उभारणीकडे वळावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका): व्यसनांपासून दूर राहून विद्यार्थ्यांनी शिक्षण, क्रीडा, कौशल्यविकास आणि राष्ट्रउभारणीकडे वळावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नवी मुंबई येथे केले. नवी मुंबई पोलिसांच्या 'नशामुक्त नवी मुंबई' अभियानाअंतर्गत महाविद्यालयीन युवक-युवतींमध्ये अमली पदार्थांच्या सेवनाविरोधात जनजागृती करण्यासाठी 'कॅम्पस कनेक्ट' या विशेष मोहिमेचा शुभारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

नेरूळ येथील डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटीज सेंटर ऑफ एक्सलन्स येथे आयोजित या सोहळ्यास वन मंत्री गणेश नाईक, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेश बालदी, रवींद्र फाटक, विक्रम पाटील, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, पनवेलच्या महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, ठाण्याच्या जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, डी. वाय. पाटील महाविद्यालयाचे अध्यक्ष विजय पाटील आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अमली पदार्थांचे आकर्षण आणि त्याचे होणारे गंभीर सामाजिक, शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेता नवी मुंबई पोलिसांनी या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत थेट पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे. महाविद्यालयीन परिसर हा युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याने या वयोगटात योग्य माहिती




व जागरूकता निर्माण करणे, हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

भारताच्या 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'चा उल्लेख करत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, देशाची ६५% युवाशक्ती ही आपली मोठी ताकद आहे. या युवाशक्तीला निष्प्रभ करण्यासाठी शत्रू राष्ट्रे आणि असामाजिक घटक तरुणांना व्यसनाच्या आहारी घालण्याचे षड्यंत्र रचत आहेत. या लढाईत अमली पदार्थांची पुरवठा साखळी पूर्णपणे नेस्तनाबूत करणे आणि तरुणांमध्ये जागृती निर्माण करून अशा पदार्थांची मागणी संपवणे, असा सर्वांगीण ३६०-डिग्री अप्रोच ही काळाची गरज आहे. प्रत्येक शैक्षणिक कॅम्पस हे या लढाईचे केंद्र असून प्रत्येक विद्यार्थी या नशाविरोधी मोहिमेचा सैनिक आहे. व्यसनाच्या गर्तेत अडकलेल्या विद्यार्थ्यांना भेदभाव न करता व्यसनमुक्ती केंद्रांच्या (डी-एडिक्शन सेंटर) माध्यमातून मदत केली जाईल. तरुणाईच्या साथीने नशा पराभूत होईल आणि 'सुजलाम सुफलाम' व विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. पोलीस, महानगरपालिका, नागरिक आणि तरुणाईच्या संयुक्त प्रयत्नांतून नवी मुंबईला पूर्णपणे नशामुक्त आणि सुरक्षित बनवण्याचा संकल्प या वेळी सोडण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्यसनमुक्ती पुनर्वसन केंद्र व व्यसनमुक्त चित्रफितीचे यावेळी लोकार्पणही करण्यात आले. या अभियानानिमित्त आयोजित जनजागृतीपार पोस्टर्स व रील्स स्पर्धेतील प्रत्येकी तीन सर्वोत्तम विद्यार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. नवी मुंबईकरांच्या सुरक्षिततेत अधिक भर घालत गुन्हेगारीवर नियंत्रण आणि अत्याधुनिक देखरेखीसाठी सज्ज असलेल्या 'प्रहारी' इंटिग्रेटेड सीसीटीव्ही कमांड सेंटरचे सीबीडी बेलापूर येथील पोलीस आयुक्त कार्यालयात आज मोठ्या उत्साहात लोकार्पण करण्यात आले. या अत्याधुनिक कमांड सेंटरचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त सहकार्यातून साकारलेल्या या प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक व रोजगार हमी मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांची विशेष उपस्थिती लाभली. विधानपरिषद सदस्य रविंद्र फाटक, विधानपरिषद सदस्य विक्रांत पाटील, विधानसभा सदस्य मंदाताई म्हात्रे, महेश बालदी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील व पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्यासह विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, पोलीस सहआयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे आणि पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे, मुंबई महानगरपालिकेचे मुख्य अभियंता शिरीष आरदवाड आदी मान्यवर उपस्थित होते. 'ऑलवेज वॉचिंग, ऑलवेज प्रोटेक्टिंग' हे ब्रिदवाक्य असलेल्या या 'प्रहारी' प्रणालीमुळे शहरातील प्रत्येक हालचालीवर चोवीस तास बारीक नजर ठेवली जाणार आहे. वाहतूक नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी हे केंद्र नवी मुंबई पोलिसांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

# दिवसभर उपवास आणि रात्री जागरण व भजन : पुत्रदा एकादशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२३ ऑगस्ट: पुत्रदा एकादशी विशेष. )**

पुत्रदा एकादशी हे संतती प्राप्ती आणि अपत्यांच्या दीर्घायुष्यासाठी भगवान श्रीविष्णूला समर्पित केलेले महत्त्वाचे व्रत आहे. हे व्रत वर्षातून दोनदा म्हणजेच पौष व श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षात येते. या दिवशी विष्णूची पूजा केल्याने सर्व मनोकामना पूर्ण होतात. ती वर्षातून दोनदा साजरी होते: पौष पुत्रदा एकादशी आणि श्रावण पुत्रदा एकादशी. संतती सुखासाठी आणि अपत्याच्या आरोग्यासाठी हे व्रत अत्यंत फलदायी मानले जाते. या दिवशी विधीनुसार श्रीविष्णूची पूजा व उपवास केला जातो. एकादशीच्या आधी दशमीपासून सात्विक आहार व नियम पाळावेत. सकाळी लवकर उठून पवित्र स्नान करावे. भगवान विष्णूसमोर दिवा लावून फळे, फुले व नैवेद्य अर्पण करावे. दिवसभर उपवास करून रात्री जागरण व भजन करावे, असे सांगितले जाते. सदर माहितीपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी वाचकांना समर्पित करताहेत... संपादक.

पुत्रदा एकादशी हे हिंदू धर्मातील एक महत्त्वाचे व्रत आहे. हे व्रत भगवान श्रीविष्णूना समर्पित असून, प्रामुख्याने संततीप्राप्ती आणि अपत्यांच्या दीर्घायुष्य आणि सुख-समृद्धीसाठी केले जाते. वर्षातून दोनदा येणारी ही एकादशी पौष आणि श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षात येते. पुत्रदा एकादशीचे प्रकार- १) पौष पुत्रदा एकादशी: पौष महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी (डिसेंबर-जानेवारी), २) श्रावण पुत्रदा एकादशी: श्रावण महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशी (जुलै-ऑगस्ट).पूजेचे महत्त्व आणि नियमसंतुष्ट जीवन- हे व्रत केल्याने अपत्य सुख मिळते आणि मुलांच्या प्रगतीमधील अडथळे दूर होतात

व्रत नियम: व्रताच्या दिवशी सकाळी लवकरात लवकर स्नान करून विष्णूची पूजा करावी. दिवसभर उपवास ठेवावा आणि रात्री जागरण करून विष्णू नामाचा जप करावा. सात्विकता: एकादशीच्या आधीपासूनच (दशमी तिथीपासून) सात्विक आहार व आचार पाळावा. दशमीच्या तिथीपासून लागू होणाऱ्या दशमीच्या दिवशीही कांदा-लसूण खाऊ नये. द्वादशीला उपवास सोडावा. तुम्हाला एकादशीचे व्रत असेल तर दशमीच्याच दिवशी सूर्यास्तापूर्वी भोजन करावे. पुत्रदा एकादशीच्या दिवशी सूर्योदयापूर्वी उठून स्नान करून स्वच्छ वस्त्र परिधान करावे. या दिवशी गंगेत स्नान करण्याचा नियम आहे. पण जर तुम्हाला हे जमत नसेल, तर तुम्ही आंघोळीच्या पाण्यात गंगाजल मिसळू शकता. स्नानानंतर भगवान श्रीविष्णूची विधीवत पूजा करावी. पंचोपचार विधीने भगवान श्री विष्णूची पूजा करून त्यांना धूप, दीप, फुल, अक्षता, रोली, फुलांच्या माळा आणि नैवेद्य अर्पण करावा आणि व्रताचा संकल्प घ्यावा. पूजेनंतर पुत्रदा एकादशी व्रताची कथा आणि दिवसभर उपवास ठेवावा. हवामान फळे खावीत आणि द्वादशीच्या दिवशी स्नान करून ब्राह्मणांना खाऊ घालावे आणि आपलेही करावे. ज्यानी एकादशीचे व्रत केले आहे त्यांनी लसूण, कांदा विरहित अन्न खाणे. यासह मनाने आणि शब्दाने ब्रह्मचर्य पाळणे. दशमीपासून द्वादशीपर्यंत भगवान विष्णूचे ध्यान करणे, अधिक योग्य ठरेल.

**उपासनेचे विशेष नियम-**

बालरूपाची पूजा: बालसुखाची कामना करण्यासाठी, बाळगोपाळांना पंचामृताने अभिषेक करावे आणि त्यांना पिवळे कपडे आणि अन्न अर्पण करावे. पाराणाचे महत्त्व: एकादशी व्रत दुसऱ्या दिवशी (द्वादशी तिथी) शुभ मुहूर्तावर सोडल्यानंतरच पूर्ण मानले जाते. दान: या दिवशी गरजूंना पिवळे अन्न किंवा कपडे दान करणे खूप शुभ मानले जाते. एखाद्या व्यक्तीने एखाद्या दिवशी उपवास केला नाही, त्यांनी एकादशीच्या दिवशी तामसिक अन्न देखील वर्ज्य करावे. यासह, खोटे बोलणे, अनैतिक कृत्य करणे, राग-लोभ, मोह, मत्सर अशा इतर गोष्टींपासून अंतर ठेवले पाहिजे. एकादशीत वैष्णव धर्माचे पालन करण्याच्या दिवशी, ते वांगी, सुपारी, मांस-दारू अशा मादक इतर गोष्टींपासून स्वतःला दूर ठेवावे. या दिवशी कांस्य भांड्यात खाऊ नये.

पुत्रदा एकादशी व्रत कथा- पुराणकाळात महिष्मतीपुरी नावाचा एक शांतीप्रिय, धर्मप्रिय असा एक राजा होता. मात्र त्याला स्वतः:चं मूल नव्हत. मग त्याच्या शुभचिंतकांनी एका लोमेश ऋषीला कारण विचारले, त्यांनी सांगितले की, मागच्या जन्मी महिष्मतीपुरी हा एक अत्याचारी, निर्दयी असा राजा होता. मागच्या जन्मी एकादशीच्या दिवशी हा राजा पाणी पिण्यासाठी एका जलाशयाजवळ आला. तेव्हा नुकतीच एक बाळंतिन पाणी पिण्यासाठी तेथे आली होती. मात्र राजाने तिला तेथून हटवले. त्याच्या दुष्कर्म कारणाने तो याजन्मी पिता बनू शकला नाही. त्यामुळे जर त्या शापातून मुक्तता हवी असेल, तर तुम्हाला हे व्रत करावे लागेल, तेव्हाच त्याचे पुण्य तुमच्या राजाच्या पदरी पडेल आणि त्यांना संतती प्राप्त होईल. या ऋषींच्या निर्देशानुसार, प्रजासेसने देखील हे व्रत केले. काही महिन्यांतच राणीने एका गोंडस बाळाला जन्म दिला. तेव्हापासून एकादशीला श्रावण पुत्रदा एकादशीचे व्रत केले जाते.

उज्जैनचे ज्योतिषाचार्य पं. मनीष शर्मा यांच्या मते श्रावण हा मराठी दिनदर्शिकेतील पाचवा महिना आहे आणि याच महिन्यातील शुक्ल पक्षातील वर्षातील ११वी एकादशी राहते. एका वर्षात एकूण २४ एकादशी असतात, ज्या वर्षात अधिक महिना असतो, त्या वर्षात २६ एकादशी असतात.

व्रताचरण : १) श्रावण सोमवार आणि एकादशीच्या योगात श्रीविष्णूंसोबतच महादेवाचीही विशेष पूजा करतात. शिवभक्तीसाठी श्रावण सोमवार अतिशय शुभ मानला जातो, कारण भगवान शिव हे या महिन्याचे आणि या ऋतूचे स्वामी आहेत. भगवान श्रीविष्णू हे एकादशीचे स्वामी मानले जातात. या कारणास्तव या दोन्ही देवतांची पूजा २३ ऑगस्ट रोजी एकत्र करू शकतात. २) पुत्रदा एकादशीचे व्रत वर्षातून दोनदा केले जाते. एक पुत्रदा एकादशी श्रावण महिन्याच्या शुक्ल पक्षात आणि दुसरी पौष महिन्याच्या शुक्ल पक्षात येते. ३) ज्या जोडप्यांना संततीप्राप्ती हवी आहे आणि ज्यांना आपल्या मुलांसाठी आनंदी, निरोगी आयुष्य हवे आहे, ते विशेषतः पुत्रदा एकादशीचे व्रत करतात. ४) ज्यांना एकादशीचे व्रत करायचे आहे ते दशमी तिथीपासूनच सात्विक दिनचर्या अंगीकारतात. सात्विक आहार घ्यावा लागतो. दशमी तिथीच्या संध्याकाळी श्रीविष्णूची पूजा करावी लागते. ५) एकादशीला सकाळी लवकर उठून स्नानानंतर सूर्याला अर्घ्य देतात. ऊँ सूर्याय नमः या मंत्राचा जप करतात. ६) सूर्यपूजेनंतर घरातील मंदिरात भगवान श्रीविष्णूची पूजा करतात आणि एकादशीचे व्रत करण्याचे ठरवतात. ७) विष्णूपूजेतही महालक्ष्मीची मूर्ती ठेवतात. दोन्ही देवतांना केशर मिश्रित दुधाने अभिषेक करतात. तुळशीची पाने टाकून नैवेद्य दाखवतात. धूप आणि दिवे लावून आरती करतात आणि विधिवत पूजन केले जाते. ८) एकादशीला दिवसभर उपवास ठेवतात, म्हणजे अन्न सेवन करत नाहीत. फळे, फळांचे रस आणि दूध यांचे सेवन करतात. सकाळ संध्याकाळ विष्णुपूजेत ऊँ नमो भगवते वासुदेवाय मंत्राचा जप करतात. ९) एकादशीनंतर म्हणजेच द्वादशी तिथीला सकाळी स्नान करून श्रीविष्णूची पूजा करून कोणत्याही गरजूला अन्नदान करतात. त्यानंतर स्वतः जेवण करतात. अशा प्रकारे एकादशीचे व्रत पूर्ण होते. १०) श्रावण सोमवारी शिवलिंगावर जल, दूध, पंचामृत अर्पण करतात. यानंतर पुन्हा एकदा जल अर्पण करतात. महादेवाला बेलाची पाने, रुईची फुले, धोत्रा इत्यादी गोष्टी अर्पण करतात. ऊँ नमः शिवाय मंत्राचा जप करतात. परमेश्वराला मिठाई आणि फळे अर्पण करतात. धूप आणि दिवे लावून आरती करतात.

हिंदूशास्त्रे सांगतात, की पुत्रदा एकादशीचं व्रत विशेषतः संतान प्राप्तीसाठी ठेवलं जातं. ज्या जोडप्यांना संतान होण्यात अडचणी येत आहेत, ते लोक हे व्रत नक्की करतात. या व्रतामुळे त्यांना संतानसुख मिळण्यास मदत होते. इतकंच नाही, तर ज्यांना आधीपासूनच मुलं आहेत, त्यांनीही आपल्या मुलांच्या चांगल्या आरोग्यासाठी, त्यांच्या सुखासाठी आणि समृद्धीसाठी हे व्रत करतात. या व्रतामुळे घरात धन-धान्याची वाढ होते, आरोग्य चांगलं राहतं आणि व्यक्तीच्या सर्व इच्छा पूर्ण होतात. पुत्रदा एकादशी शब्दशः पुत्र देणारी एकादशी हा एक हिंदू पवित्र दिवस आहे, जो हिंदू महिना पौष (डिसेंबर-जानेवारी) मधील शुक्ल पक्षाच्या ११व्या दिवशी एकादशी येतो. श्रावण (जुलै-ऑगस्ट) महिन्यातील दुसऱ्या पुत्रदा एकादशीपासून वेगळे ओळखण्यासाठी या दिवसाला पौष पुत्रदा एकादशी असेही म्हटले जाते , जिला श्रावण पुत्रदा एकादशी असेही म्हणतात. या दिवशी जोडपी उपवास करतात आणि चांगल्या पुत्रासाठी विष्णू देवाची पूजा करतात. हा दिवस विशेषतः विष्णूचे अनुयायी असलेल्या वैष्णवांकडून पाळला जातो. हिंदू समाजात मुलाला अत्यंत महत्त्वाचे मानले जाते, कारण तो वृद्धापकाळात आई-वडिलांची काळजी घेतो आणि श्राद्ध (पूर्वजांचे विधी) अर्पण करून मृत्यूनंतरच्या जीवनात त्यांच्या कल्याणाची खात्री करतो, असा समज आहे. जरी प्रत्येक एकादशी विशिष्ट ध्येयांसाठी निर्धारित केली असली तरी, पुत्रप्राप्तीचे ध्येय इतके महान आहे की दोन पुत्रदा (पुत्र देणारी) एकादशी त्यासाठी समर्पित आहेत. यावर्षी २०२६ मध्ये ती २३ ऑगस्ट रोजी पाळली जात आहे आणि दुसरी एकादशी जानेवारीत पाळली जाईल. बाकीच्या ध्येयांना हा विशेषाधिकार मिळत नाही. भगवान श्रीविष्णूच्या पूजेसह प्रार्थना आणि धार्मिक विधी, तारीख चांद्र दिनदर्शिकेनुसार ठरवले जाते.

दंतकथा: भविष्य पुराणात भगवान श्रीकृष्णाने राजा युधिष्ठिराला सांगितलेली पुत्रदा एकादशीची कथा प्रकट होते- एकदा, भद्रावतीचा राजा सुकेतुमान आणि त्याची राणी शैब्य यांना संतती नसल्यामुळे दुःख झाले होते. त्या जोडप्याला तसेच त्यांच्या मृत पूर्वजांना चिंता होती की श्राद्ध करण्यासाठी कोणी नसल्यामुळे त्यांना शांती मिळणार नाही आणि मृत्यूनंतर ते आत्मे बनतील. निराश होऊन, राजाने आपले राज्य सोडले आणि कोणालाही न कळवता तो वनात गेला. काही दिवस वनात भटकल्यानंतर, सुकेतुमान पुत्रदा एकादशीच्या दिवशी मानसरोवर तलावाच्या काठावरील काही ऋषींच्या आश्रमात पोहचला . ऋषींनी सांगितले की ते दहा दैवी विश्वदेव होते . त्यांनी राजाला पुत्रप्राप्तीसाठी पुत्रदा एकादशीचे व्रत पाळण्याचा सल्ला दिला. राजाने त्यांचे ऐकले आणि तो राज्यात परतला. लवकरच, राजाला पुत्रप्राप्ती झाली, जो मोठा होऊन एक शूर राजा बनला.

पुत्रदा एकादशीचे व्रत हे विवाहित महिला प्रामुख्याने करतात. ज्यांना संतान हवे आहे त्यांच्यासाठी हे व्रत विशेष फलदायी असल्याचे मानतात. तसेच ज्यांना मुलं आहेत त्यांच्या मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीही हे व्रत केलं जातं. पौष महिन्यात येणारी पुत्रदा एकादशी संतान प्राप्तीसाठी आणि घरात सुख-समृद्धी येण्यासाठी खूप महत्त्वाची मानली जाते. या दिवशी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मीची पूजा केल्याने धन, चांगले आरोग्य आणि सर्व मनोकामना पूर्ण होतात अशी मान्यता आहे. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! सर्व बंधू भगिनींना पुत्रदा एकादशी निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी.**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिरजवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

# कळंब येथे २४ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा आणि सन्मान सोहळ्याचे आयोजन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) - ईद-ए-मिलादुन्नबी आणि ज्ञानप्रसारक मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आगाज फाउंडेशन आणि शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा व पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता मोहेकर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या हस्ते होणार असून महाराष्ट्रातील प्रसिद्ध व्याख्याते अविनाश भारती हे विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी आमदार कैलास दादा घाडगे-पाटील, ज्ञानप्रसारक मंडळाचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, शिवसेनेचे अजित पिंगळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील, येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे डॉ. संदीप तांबारे, श्रीधर भवर, डॉ. साजेद चाऊस, बालाजी जाधवर, तारेक मिर्झा, अतुल गायकवाड, अमजद मिर्झा, उमान मिर्झा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

स्पर्धेसाठी तीन विषय देण्यात आले आहेत. यामध्ये मोहंमद पैगंबर यांचे महिलांविषयीचे विचार : समानता, सन्मान आणि अधिकार, समानतेचा संदेश : मोहंमद पैगंबरांच्या विचारांची आजच्या समाजातील उपयुक्तता आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि मुस्लिम समाज : सहिष्णुता, समन्वय आणि सर्वधर्मसमभावाचा आदर्श या विषयांचा समावेश आहे.

स्पर्धेतील प्रथम विजेत्यास २१ हजार रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकास ११ हजार रुपये, तृतीय क्रमांकास ७ हजार रुपये आणि चतुर्थ क्रमांकास ४ हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. तसेच चार उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी ३ हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात येतील. सर्व सहभागी स्पर्धकांना ट्रॉफी व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या स्पर्धकांसाठी निवासाची व्यवस्था करण्यात आली असून त्यासाठी पूर्वकल्पना देणे आवश्यक आहे.

याच कार्यक्रमात सलीमभाई मिर्झा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार प्राप्त मोहसीन खान यांचा मुख्तार मिर्झा आणि मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात येणार आहे. तसेच कळंब तालुक्यातील पत्रकारांचाही विशेष गौरव करण्यात येणार आहे.

सदरील स्पर्धेचा सायंकाळी बक्षीस वितरण समारंभ तहसीलदार हेमंत ढोकले, पोलीस निरीक्षक शकील शेख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजी कापसे, नगराध्यक्षा सुनंदा कापसे, नगरसेवक तथा गटनेते संजय मुंदडा, छत्रपती शिवराय मुस्लिम ब्रिगेडचे इमरान मिर्झा आदी मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मोहेकर महाविद्यालयाचे अरविंद शिंदे आणि आगाज फाउंडेशनचे मुस्तान मिर्झा व अकिब पटेल यांनी केले आहे.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी

मुस्तान मिर्झा - ८९८३८३३८३८, अकिब पटेल - ९६२३५९५२२२, ज्ञानेश्वर नरटे - ९४०३०९३००९ या क्रमांकावर संपर्क साधावा असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'एक राखी जवानासाठी' उपक्रम उत्साहात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी प्रतिनिधी - एक राखी जवानासाठी हा उपक्रम विद्या मंदिर टाकळी वाडी या शाळेतील विद्यार्थीनि व शिक्षिका यांनी राबवून सैनिक वेल्फेअर असोसिएशन टाकळी वाडी पदाधिकारी यांच्या कडे सुपूर्त केल्या.

तालुका शिरोळ येथील विद्या मंदिर, टाकळीवाडी या शाळेतील विद्यार्थी व शिक्षिकांनी देशाच्या सीमेवर अहोरात्र सेवा बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'एक राखी जवानासाठी' हा उपक्रम उत्साहात राबविला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी व शिक्षिकांनी प्रेम आणि आपुलकीने तयार केलेल्या राख्या सैनिक वेल्फेअर असोसिएशन, टाकळीवाडीच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्त करण्यात आल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी जवानांच्या त्याग, शौर्य आणि देशसेवेप्रती आदर व्यक्त केला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षिका, सैनिक वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष माजी ऑनररी कॅप्टन रमेश निर्मळे, माजी सैनिक दादा खोत तसेच समीर आरकाटे उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि सैनिकांविषयी आदराची भावना निर्माण करणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. उपस्थित मान्यवरांनी शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# स्टुडंट इंडक्शन प्रोग्रॅममधून विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन संधींची ओळख



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विशेष अधिकार प्रदत्त महाविद्यालयात बी.ए. भाग १च्या विद्यार्थ्यांसाठी स्टुडंट इंडक्शन प्रोग्रॅमचे आयोजन करण्यात आले. नव्याने महाविद्यालयीन जीवनात प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक रचना, विविध विभाग, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, उपलब्ध सुविधा तसेच भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक संधींची माहिती या कार्यक्रमातून देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. समाधान माने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पदवी विभागाचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत काळे यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभाग व शैक्षणिक उपक्रमांची माहिती देतानाच नियमित महाविद्यालयीन उपस्थिती, अध्ययनातील सातत्य आणि शिस्त यांचे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थी कल्याण कक्ष, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, युवा महोत्सव व सांस्कृतिक विभाग, प्लेसमेंट सेल, क्रीडा विभाग, कर्मवीर क्रीडा महोत्सव, एनसीसी, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी संसद तसेच विविध क्लब क्टिव्हिटीमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

महाविद्यालयातील ऑन जॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप, कौशल्याधारित अभ्यासक्रम, उद्योजकता विकास, शिष्यवृत्ती, ग्रंथालय सुविधा, अॅकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट, परीक्षा व मूल्यमापन पद्धती याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध शासकीय व इतर क्षेत्रांत करिअरच्या उपलब्ध संधी आणि त्यासाठी आवश्यक असणारी तयारी याबाबतही माहिती देण्यात आली.

पंढरपूर शहर व परिसरातील धार्मिक, आध्यात्मिक व पर्यटन क्षेत्राबरोबरच शेती व शेतीपूरक व्यवसाय, लघुउद्योग, औद्योगिक क्षेत्र, वाहतूक व्यवसाय, शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था आदी क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या रोजगार व उद्योजकतेच्या संधींचीही विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात आली.

प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात झालेले बदल आणि विद्यार्थ्यांसमोर निर्माण झालेल्या नव्या संधी व आव्हानांवर मार्गदर्शन केले. बदलत्या शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेत विद्यार्थ्यांनी कौशल्यविकास, ज्ञानवृद्धी आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर द्यावा, असे त्यांनी सांगितले. पंढरपूर परिसरातील आध्यात्मिक पर्यटन क्षेत्रातील विविध संधींचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून त्यातून रोजगार व उद्योजकतेच्या संधी निर्माण कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील बदलांचा विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि समाजाने सकारात्मक दृष्टिकोनातून स्वीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. समाधान माने यांनी महाविद्यालयात वर्षभर राबविण्यात येणाऱ्या विविध विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांची माहिती देऊन विद्यार्थ्यांनी त्यात उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन केले. महाविद्यालयातील विविध उपक्रम हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात प्रा. डॉ. रमेश शिंदे, प्रा. दादा आरेकर, प्रा. मारुती नायकू, प्रा. डॉ. सुशील शिंदे, प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी, प्रा. डॉ. आनंद शिंदे, प्रा. डॉ. नवनाथ पिसे, प्रा. अनिल परमार, प्रा. डॉ. धनंजय साठे, प्रा. डॉ. अमोल ममलया, ग्रंथपाल प्रा. डॉ. विनया पाटील, प्रा. रियाज शेख व प्रा. सुहास कांबळे यांनी विद्यार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास पदवी विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, प्रा. डॉ. गोवर्धन देकोंडा, प्रा. डॉ. दत्ता डांगे, प्रा. डॉ. दादासाहेब हाके आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर आभार प्रा. डॉ. प्रशांत नलावडे यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# युवा पिढीवर महाराष्ट्र घडविण्याची जबाबदारी आहे : विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर

## स्वेरीत 'ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीच्या माध्यमातून विकसित महाराष्ट्राची निर्मिती' यावर मार्गदर्शन सत्र संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – 'आजचा विद्यार्थी आपला वेळ हा विज्ञान व तंत्रज्ञान संदर्भातील टूल्स वाचन करण्यात घालवत असतो. स्वेरीतील विद्यार्थ्यांशी संवाद होणे हा एक अविस्मरणीय क्षण आहे. पंढरपूरची ही धरती श्रद्धेची, शेतकऱ्यांची व ज्ञानाची धरती आहे म्हणून या त्रिवेणी संगमाच्या धरतीला चरण स्पर्श करताना मनस्वी आनंद वाटतो. ज्या भूमीत पांडुरंगाच्या दर्शनासाठी लाखो भाविक व वारकरी भक्तिभावाने येतात त्याच भूमीत तंत्रज्ञानाची नवी पिढी घडत आहे, ही साधी सोपी गोष्ट नाही. विज्ञान आणि तंत्रज्ञान जोपर्यंत सामान्य माणसांपर्यंत पोहचत नाही, तोपर्यंत प्रगतीला अर्थ नाही. शिक्षकांच्या माध्यमातून येणार्या युवा पिढी समोर एकविसाव्या शतकातील महाराष्ट्र घडवण्याची जबाबदारी आहे.' असे प्रतिपादन महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी केले.




स्वेरीमध्ये 'ज्ञान, तंत्रज्ञान आणि युवाशक्तीच्या माध्यमातून विकसित महाराष्ट्राची निर्मिती' या विषयावर आयोजिलेल्या मार्गदर्शन सत्रात महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर हे मार्गदर्शन करत होते. अध्यक्षस्थानी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभेचे आमदार समाधान अवताडे हे होते. महाराष्ट्र गीत, स्वेरीगीत व दीपप्रज्वलनानंतर स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी प्रास्ताविकात सर्वांचे स्वागत करून स्वेरीची पार्श्वभूमी सांगितली. श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या नावातच असलेल्या संशोधनामुळे आता विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण करत ही संस्था संशोधनामध्ये प्रगती करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना अॅड. नार्वेकर म्हणाले की, 'स्वेरी कॅम्पसमध्ये प्रामुख्याने इंग्रजी भाषा वापरली जाते. तरीपण आपल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी, हिंदी, मराठी भाषा ही उत्तमपणे येते ही बाब अत्यंत महत्वाची आहे. भारतात साधी सुई बनत नव्हती परंतु आज इथे सर्वांच्या परिश्रमाच्या जोरावर भारतातील माणूस चंद्रावर पोहचत आहे. ही तंत्रज्ञानाची कमाल आहे. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानात योग्य शिक्षण प्राप्त केले तर जगातील सर्वोत्तम देश म्हणून भारत देश पुढे येईल म्हणून येणाऱ्या काळात विद्यार्थ्यांना जबाबदारीने वाटचाल करावी लागेल. महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रात देशात एक नंबरवर आहे. येणाऱ्या काळात 'डेटा सेंटर' वाढत आहेत. महाराष्ट्रात 'डेटा सेंटर' केंद्रस्थानी राहील. ज्याच्याकडे योग्य नेता आहे, तेथे योग्य शक्ती असते. येणार्या काळात महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात डेटा सायन्सच्या माध्यमातून नवीन तंत्रज्ञानाला विकसित करता येत आहे त्यामुळे आपले जीवन आणखी सोपे होईल परंतू पुढील काळ अधिक आव्हानात्मक बनेल हेही तितकेच खरे आहे. आता 'एआय' च्या माध्यमातून शेती, व्यवसाय प्रचंड प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे लोकांचे जीवन सुखी-समृद्ध होत आहे. म्हणून तरुण वर्गाला गुणवत्तापूर्ण केले तर भारत भविष्यात नंबर एक वर राहील, हे मात्र निश्चित. तंत्रज्ञानाशिवाय विकास हा अशक्यच आहे म्हणून आजच तंत्रज्ञानाकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. लोकशाही टिकवायची असेल तर जबाबदाऱ्या व्यवस्थितपणे हाताळाव्या लागणार आहेत. जीवनात यशस्वी बनायचे असेल तर परस्पर सहकार्य करण्याची गरज आहे. लोकशाहीत वेगवेगळे विचार एकत्र येऊन पुढे त्यातून चांगले निर्णय घेणे शक्य आहे म्हणून लोकशाही टिकवायची असेल तर येणाऱ्या काळात आपले विचार व्यक्त करणे गरजेचे आहे. मूलभूत अधिकाराबरोबर संविधानात्मक विरोध करणेही तितकेच आवश्यक आहे.' असे सांगत त्यांनी शास्त्रज्ञ मार्टिन लूथर किंग यांचे विचार ऐकवले. अध्यक्षस्थानावरून बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की, 'महाराष्ट्र ही संतांची, समाज सुधारकांची आणि थोरांची भूमी आहे. अशा भूमीत विज्ञान, तंत्रज्ञान व युवाशक्तीचा ताळमेळ लागला तर हा महाराष्ट्र जगाच्या होत असलेल्या प्रगतीत भर पाडण्याचे कार्य करेल. प्रगत राष्ट्रे ही ज्ञानाच्या जोरावर प्रगती करण्याचे काम करत आहेत आणि हे कार्य युवाशक्ती करत आहे. युवक हे देशाचे आधारस्तंभ आहेत. या माळरानावर छोटेसे रोपटे लावण्याचे काम डॉ. रोंगे सरांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. आता याला गुणवत्तेची जोड मिळत असून याचे वटवृक्षात रूपांतर झाले आहे. एसीआयसी – स्वेरी या केंद्राच्या माध्यमातून झालेल्या संशोधनातून एका नालंदा विद्यापीठाच्या प्रतिकृतीची निर्मिती करण्याचे काम स्वेरीने केले आहे. या केंद्रामुळे ग्रामीण भागातील तरुणांमध्ये असलेल्या कल्पकतेला मोठी चालना मिळत आहे. स्वेरीचे कार्य हे नालंदा विद्यापीठाप्रमाणे सुरु आहे. आज जर नालंदा विद्यापीठ असले असते तर आपला भारत हा जगातील प्रचंड शक्तिशाली भारत राहिला असता हे त्यांनी अभ्यासपूर्ण भाषणातून सांगितले. यावेळी विधानसभेचे कायदेशीर सल्लागार अॅड. संदीप केकाणे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. बनकर, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. सतिश मांडवे, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सागर घोडके यांनी केले तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांनी आभार मानले.

# कासेगाव एमआयडीसीच्या कामाला गती द्या; आमदार समाधान आवताडेंचा पाठपुरावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर / प्रतिनिधी – पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथे प्रस्तावित असलेल्या एमआयडीसीच्या कामाला गती मिळावी, यासाठी आमदार समाधान आवताडे यांनी मुंबई मंत्रालयातील कार्यालयात एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्रसिंह कुशवाह यांची भेट घेतली. यावेळी प्रस्तावित एमआयडीसीसाठी आवश्यक असलेली भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

कासेगाव एमआयडीसीचा प्रकल्प प्रत्यक्षात मार्गी लागण्यासाठी भूसंपादन प्रक्रियेतील सद्यस्थिती, येणाऱ्या अडचणी तसेच त्या सोडविण्यासाठी आवश्यक असलेल्या पुढील कार्यवाहीची माहिती आमदार आवताडे यांनी घेतली. प्रकल्पाच्या कामात कोणताही अनावश्यक विलंब होऊ नये आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण व्हावी, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी केली. कासेगाव येथे एमआयडीसी साकारल्यास पंढरपूर तालुक्यात औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन उद्योग, लघु व मध्यम उद्योग तसेच स्थानिक उद्योजकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच परिसरातील युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होणार आहेत. त्यामुळे हा प्रकल्प पंढरपूरच्या भविष्यातील औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

> **भूसंपादन प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यासाठी एमआयडीसीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा**

पंढरपूर तालुक्यात उद्योगांना पोषक वातावरण निर्माण करून स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी कासेगाव एमआयडीसीचा प्रकल्प लवकरात लवकर प्रत्यक्षात येणे आवश्यक आहे. या प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर सातत्याने पाठपुरावा केला जात असून, भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करून एमआयडीसीचे काम मार्गी लागेपर्यंत आवश्यक त्या पातळीवर पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे आमदार समाधान आवताडे यांनी सांगितले.

# विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर – राज्याचे विधानसभा अध्यक्ष अँड राहुल नर्वेकर यांनी दिनांक २१ शुक्रवार रोजी श्री बिल्डर कुमनी मातेचे दर्शन घेतले यावेळी मंदिर समितीचे वतीने मंदिर समितीचे सदस्य ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांनी श्री ची मूर्ती व उपरणे देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला यावेळी मंगळवेढा पंढरपूर विधानसभेची लोकप्रिय आमदार समाधान आवताडे, माढा विधानसभेचे आमदार



अभिजीत पाटील, प्रांत अधिकारी सचिन इ थापे, तहसीलदार सचिन लंगोटे, मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रवीण कुमार गम,स्सेवरि कॉलेजचे



संस्थापक सचिव, प्राचार्य डॉक्टर बीपी रोंगे सर, तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

# हावरगाव येथे विद्यार्थ्यांना सुरक्षा व सायबर गुन्ह्यांविषयी मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) – कळंब तालुक्यातील हावरगाव येथे धाराशिव जिल्हा पोलीस अधीक्षक मा. श्रीमती रितू खोखर मॅडम आणि अपर पोलीस अधीक्षक मा. श्री. सचिन पांडकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली संत ज्ञानेश्वर माऊली माध्यमिक विद्यालयात स्टुडंट्स पोलिस केडेट (एस. पी. सी) कार्यक्रमांतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी पो.उप.नि इक्बाल सय्यद व पो.ना. अतिश सरफळे यांनी विद्यार्थी व विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्यांची शारीरिक व मानसिक सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता असली पाहिजे. यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सी.सी.टीव्ही कॅमेरे बसवणे, छेडछाडीच्या तक्रारींसाठी अंतर्गत तक्रार समिती(आय. सी. सी) स्थापन करणे, विद्यार्थिनींसाठी स्व-संरक्षण प्रशिक्षण, मानसिक समुपदेशनासाठी समुपदेशक नियुक्त करणे तसेच सायबर गुन्हे व ऑनलाईन फसवणुकीपासून बचावासाठी डिजिटल सुरक्षा याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**आलेगाव खुर्द येथे आमदार मुक्कामी 'आपल्या गावी' अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद**

**आ.अभिजीत पाटलांच्या अभियानाला जनतेचा दमदार प्रतिसाद**

# आमदार अभिजीत पाटील आलेगाव येथे मुक्कामी राहून नागरिकांच्या अडचणी सोडविल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



माढा/पंढरपूर (प्रतिनिधी) – मत मागण्यासाठी जनतेच्या दारी जाणारे लोकप्रतिनिधी आता जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी थेट गावात मुक्काम करून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'आमदार मुक्कामी, आपल्या गावी' या नावीन्यपूर्ण अभियानाचा प्रारंभ माढा मतदारसंघातील आलेगाव खुर्द या गावातून करण्यात आला. या उपक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या विविध समस्या आमदारांसमोर मांडल्या.

मत मागायला केवळ लोकांच्या दारी जायचे आणि प्रश्न असतील तर लोकांनी आपल्या दारी यायचे, ही कल्पनाच मला पटत नाही. मत मागायला जसे गावोगावी जातो, तसेच जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्या गावात जाऊन, जनतेमध्ये राहून त्या सोडविल्या पाहिजेत, अशी भूमिका आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी मांडली.

गावातील नागरिकांना आपल्या समस्या घेऊन वारंवार तहसील, पंचायत समिती, कृषी कार्यालय, महावितरण किंवा अन्य शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांना थेट गावात आणण्याचा निर्णय या अभियानांतर्गत घेण्यात आला आहे. त्यामुळे 'अधिकारी गावात आणि प्रश्न आमदारांसमोर' अशी या अभियानाची कार्यपद्धती राहणार आहे.

आलेगाव खुर्द येथे झालेल्या कार्यक्रमासाठी तहसीलदार संजय भोसले, पोलीस प्रशासनातील बाळासाहेब भरणे, गटविकास अधिकारी महेश सुळ, ग्रामसेवक, तलाठी, कृषी अधिकारी, महावितरणचे अधिकारी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या सर्व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नागरिकांनी आपल्या वैयक्तिक तसेच गावपातळीवरील समस्या मांडल्या. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमोरच प्रश्न मांडले जात असल्याने त्यावर तत्काळ मार्ग काढण्याच्या दृष्टीने चर्चा करण्यात आली.

**शेतीपासून घरकुलापर्यंत विविध प्रश्नांवर चर्चा**

शेतकऱ्यांचे शेतीविषयक प्रश्न, वीजपुरवठ्याच्या अडचणी, शेतजमिनीच्या बांधांचे प्रश्न, रस्ते, रेशन धान्य, पाणीपुरवठा, गावातील मूलभूत सुविधा, शाळा, घरकुल, आरोग्य सेवा, विविध शासकीय दाखले यांसह नागरिकांच्या अनेक प्रश्नांवर यावेळी सविस्तर चर्चा झाली.

अनेक नागरिकांना शासकीय कार्यालयात वारंवार जाणे शक्य होत नाही. एकाच समस्येसाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधावा लागत असल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होते. ही अडचण लक्षात घेऊन सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना एकाच ठिकाणी आणून नागरिकांचे प्रश्न ऐकून घेण्याचा प्रयोग या अभियानातून करण्यात आला आहे.

**'जनतेच्या चेहऱ्यावरचे समाधान हीच अभियानाची ऊर्जा'**

गावकऱ्यांशी झालेला थेट संवाद, त्यांच्या अडचणी समजून घेण्याची मिळालेली संधी आणि प्रश्न मार्गी लागल्यानंतर नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान, हीच या अभियानाची ऊर्जा असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले. जनतेच्या दारी जाणे, जनतेचा आवाज ऐकणे आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हे माझे कर्तव्य आहे. 'आमदार मुक्कामी, आपल्या गावी' हे अभियान त्याच कर्तव्याचा एक भाग आहे. आलेगाव खुर्द येथे मिळालेल्या उदंड प्रतिसादाबद्दल सर्व नागरिकांचे मनापासून आभार, असेही आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले.

> **मत मागायला जसे गावोगावी जातो, तसेच समस्या सोडविण्यासाठीही जनतेच्या गावात गेलं पाहिजे. नागरिकांनी आपल्या समस्या घेऊन कार्यालयांच्या फेऱ्या मारण्यापेक्षा प्रशासनानेच जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे. 'आमदार मुक्कामी, आपल्या गावी' अभियानातून जनतेचा थेट संवाद, प्रशासनाचा समन्वय आणि समस्यांचे तत्काळ निराकरण यावर माझा भर राहणार आहे.**
> **– आ.अभिजीत आबा पाटील, माढा, विधानसभा मतदारसंघ**

या अभियानाच्या माध्यमातून पुढील काळात माढा मतदारसंघातील विविध गावांमध्ये मुक्काम करून नागरिकांशी थेट संवाद साधण्यात येणार असून, गावागावातील स्थानिक प्रश्न प्रशासनाच्या मदतीने सोडविण्याला प्राधान्य दिले जाणार आहे. त्यामुळे या उपक्रमाकडे मतदारसंघातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# आवताडे शुगरने स्थानिक उद्योगांना बळ देण्यासोबतच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या : ना. ॲड.राहुल नार्वेकर

## सीबीजी प्रकल्पाचे भूमिपूजन व वीज वितरणाचा शुभारंभ उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/मंगळवेढा/प्रतिनिधी- आवताडे शुगर अँड डिस्टीलरीज प्रा. ली. या साखर कारखान्याने स्थानिक उद्योगांना बळ देण्यासोबतच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या असे प्रतिपादन ना. ड.राहुल नार्वेकर महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ना.राहुल नार्वेकर यांनी व्यक्त केले आहे. ना. नार्वेकर यांच्या शुभहस्ते व पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार कारखान्याचे मार्गदर्शक सम ाधान आवताडे यांच्या प्रमुख उप- स्थितीमध्ये मंगळवेढा तालुक्यातील नंदुर येथील आवताडे शुगर अँड डिस्टिलरीजमध्ये उभारण्यात येणाऱ्या १२ ढझऊ क्षमतेच्या उइॠ (ऊेािीीशव इळे-ॠीी) प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न झाले यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते, तसेच सहवीज निर्मिती प्रकल्पातून वीज वितरणाचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. या प्रकल्पामुळे ऊर्जानिर्मिती, पर्यायी इंधन आणि शेतीपूरक उद्योगांना चालना मि ळण्यास मदत होणार असून, उपलब्ध संसाधनांचा अधिक प्रभावीपणे वापर करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. मंगळवेढा तालुक्यासारख्या ग्रामीण भागात उद्योग आणि आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालून विकासाच्या नव्या संधी निर्माण करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

यावेळी श्री संत दामाजी मंदिर संस्थेचे अध्यक्ष विष्णुपंत आवताडे, कारखान्याचे चेअरमन संजय आव- ताडे, नगरसेवक सोमनाथ आवताडे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर, उपनगराध्यक्ष प्रा. येताळा भगत, प्राचार्य डॉ.बी पी रोंगे, नगरसेवक प्रसाद कळसे, माजी सभापती दिलीप गुरव, सभापती दिपाली ताड, भाजपा तालुकाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, उपसभापती विजयसिंह देशमुख, कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुर्मदास चटके, सरव्यवस्थापक सुधीर पाटील, जिल्हा परिषद सदस्या करुणा शिवशरण, रमेश भांजे, बापूराया चौगुले, विनायक यादव, माजी संचालक राजन पाटील, द्रोणाचार्य हाके, विजय माने, त्याचबरोबर कारखाना विविध खात्यांचे खाते प्रमुख, पदाधिकारी कर्मचारी आदी मान्यवर तसेच शेतकरी उपस्थित होते.

मंगळवेढ्यासारख्या ग्रामीण भागात अशा आधुनिक आणि पर्यावरणपूरक प्रकल्पांची उभारणी होणे ही काळाची गरज आहे. यामुळे स्थानिक उद्योगांना बळ मिळण्यासोबतच रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील आणि शेतकरी, उद्योग व पर्यावरण यांचा समतोल साधत परिसराच्या आर्थिक विकासाला गती मिळेल. मंगळवेढ्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा देण्यासाठी अशा प्रकल्पांना सातत्याने प्रोत्साहन देण्याचा माझा प्रयत्न राहील असेही ना. नार्वेकर यांनी सांगितले.

## प्रेषित हजरत महमद पैगंबर जयंती निमित्त नळदुर्ग येथे जय्यत तयारी : विद्यूत रोषणाईने नळदुर्ग शहर उजाळले



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी(एस.के.गायकवाड):

ईद -ए -मिला दुनब्बी अर्थात प्रेषित हजरत महंमद पैगंबर जयंती निमित्त तुळजापूर तालूक्यातील नळदुर्ग शहरात जय्यत तयारी करण्यात आली असून नळदुर्ग शहर विद्युत रोषणाईने उजाळून निघाले आहे.जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे समजते.

दि.२६ /०८ / २०२६ रोजी इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत महंमद पैगंबर यांची जयंती असून या जयंती निमित्ताने नळदुर्ग शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे समजते.

दिनांक २६ ऑगस्ट रोजी प्रेषित म हंमद पैगंबर जयंती निमित्ताने शहरातील मुख्य रस्त्यावरून सकाळी ठिक १. वा. दरम्यान मोटार सायकल रॅली काढण्यात येणार असून दुपारी ठिक २. वा. दरम्यान जयंती निमित्ताने शहरातील मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढली जाणार आहे.ही मिरवणूक असार मजिद किल्ला गेट मुलतान गल्ली कुरेशी गल्ली इनामदार गल्ली जामा मजिद चौक हात्ती मोहला भवानी चौक चावडी चौक क्रांती चौक भुई गल्ली मार्गे असार मजिद येथे या मिरवणुकीची सांगता होणार आहे.तर संध्याकाळी ठिक ९.०० .वाजत हाफीसाब सय्यद सगीर अहमद जहागीरदार नक्षबंदी यांच्या अधिपत्याखाली विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तरी नळदुर्ग शहारातील सर्व नगरवाशियानी या सर्व कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवून सहकार्य करावे असे आवहान जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष शायन समीउल्ला काझी, उपाध्यक्ष युनूस इनामदार, युसूब शेख सह सर्व सन्मानिय सदस्य यानी केले आहे.

## श्रद्धे सुधाकरपंत परिचारक यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये व्याख्यान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक (मोठे म ालक) यांच्या सहाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पंढरपूर येथे प्रसिद्ध व्याख्याते श्री वसंत हंकारे यांच्या संघर्षातून यशाकडेहे प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते गुरुवार दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी कर्मयोगी पॉलिटेक्निकल इमारतीत हा कार्यक्रम उत्साह पूर्ण वातावर पार पडला व श्रद्धे सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमा पूजन करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले कर्मवीर इन्स्टिट्यूट चे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

यावेळी श्री वसंत हंकारे यांनी विद्यार्थ्यांची संवाद साधताना संघर्ष आणि अडचणी अपयश आणि जिद्दीचा , यशाचा प्रवास त्याचबरोबर आई वडिलांचे आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी अस- लेले योगदान आणि त्याग ते यांची जाणीव करून दिली.

बाप म्हणजे केवळ घरातील कर्ता पुरुष नसून, आपल्या मुलांच्या स्वप्नांसाठी स्वतःची अनेक स्वप्ने बाजूला ठेवत संघर्षातील आधार असतो, भावनेतून त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या पालकांकडे नव्या दृष्टीने पाहण्याचा संदेश दिला व म ुलांच्या शिक्षणासाठी त्यांच्या भविष्यासाठी आणि त्यासाठी पालक करत असलेल्या कष्टाची जाणीव विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांनी ठेवावी तसेच त्यांच्या त्यागाचे सार्थक आपल्या कर्तुत्वाने करावे असेही आव्हान त्यांनी केले. विविध अनुभव प्रसंग आणि भावनिक उदाहरणाच्या सहाय्याने त्यांना आई-वडील यांची स्वप्न पूर्ण करून विद्यार्थ्यांनी मला भावनिक स्पर्श केला व विद्यार्थ्यांना जीवनातील संघर्षाचा सामना करण्याची प्रेरणा देताना पालकांच्या तेला- ची जाणीव करून द्यावी आणि आपल्या कर्तुत्वान आणि अभिमान वाटेल असे जीवन जगण्याचा संदेश या व्याख्यानातून देण्यात आला तसेच विद्यार्थ्यांनी सोशल मीडिया व्यसनाधीनच्या त्यांच्या आहारी न जाता आपल्या आयुष्यातील योग्य ध्येय साध्य करणे असा मोलाचा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहन परिचारक यांच्या पेरणी- तून विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी व त्यांचे संस्कार दूर होण्यासाठी सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाचे कर्मयोगी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील कर्मवीर इन्स्टिट्यूट चे प्राचार्य डॉक्टर एटी कणसे रजिस्टर गणेश वाळके तसेच कर्मयोगी शिक्षण संकुलातील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते संघर्षातून यशाकडे हा संदेश देणारे आणि बाप समजा- वून घेताना पालकाच्या त्यागाचे जाणीव करून देणारे हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय व प्रेरणादायी ठरले व सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक सुशील कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले.

## अरण्यऋषी मारुती चितमपल्ली पुस्तकाचे गाव तर च प्रा. क्रिष्णा चौधरी कवितेचे घर; मराठी भाषा मंत्री यांनी घोषित केले : साहित्यिक संवाद व आढावा बैठकीत निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग अंतर्गत गोंदिया जिल्ह्यात पुस्तकाचे गाव हे मारुती चितमपल्ली यांचे नाव तसेच कवितेचे घर याला प्रा. क्रिष्णा चौधरी ही नावे राज्याचे मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी घोषित केले आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय दा- लनात याप्रसंगी डॉ. उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी मंदार पत्की, मुख्य कार्यकारी अधिकारी दोतुंला, मराठी भाषा संचालक डॉ. शामकांत देव्हरे, युवराज गंगाराम, लखनसिह कटरे, डॉ.



शरद मेश्राम, मुन्नाभाई नंदागवळी, मिलिंद रंगारी, डॉ. इंद्रकला बोपचे, प्रा. राहुले, मुरलीधर खोटेले, श्री. अंबादे, चंद्रकुमार बनकर असे जिल्ह्यातील अभ्यासक, प्राध्यापक व साहित्यिक प्रामुख्याने उपस्थित होते. यादरम्यान मंत्री सामंत संवाद साधताना सांस्कृतिक भवन, बोली भाषा कोश, आणि पुस्तकाचे गाव व कवितेचे घर यांचीही घोषणा करण्यात आली. यामध्ये डॉ. शरद मेश्राम यांनी वैदर्भीय नाट्य : परंपरा व वर्तमान तसेच मुन्नाभाई नंदागवळी यांनी पळसफुलांचा धम्मसोहळा हे कवितासंग्रह सामंत यांना भेट दिला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी बेहरे यांनी तर श्री. सूत्रसंचालन श्री. देशमुख यांनी केले.

## अक्कलकोटमध्ये ईद-ए-मिलादुन्नबी निमित्त भव्य रक्तदान व मोफत आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : ईद-ए-मि लादुन्नबीच्या निमित्ताने अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम सम ाजाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच सोलापूर कॅन्सर सेंटर हॉस्पिटलच्या वतीने मोफत आरोग्य व कर्करोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

गतवर्षीच्या रक्तदान शिबिराला नागरिक व रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. या रक्तदानामुळे वर्षभरात अनेक गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्यात मदत झाली. याच सामाजिक उपक्रमाची परंपरा पुढे सुरू ठेवत यंदाही मोठ्या संख्येने नागरिकांनी रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

दिनांक : बुधवार, २६ ऑगस्ट २०२६

ठिकाण : नगरपरिषद उर्दू शाळा क्र. २, कारंजा चौक, अक्कलकोट

रक्तदान करा, जीवन वा- चवा आणि माणुसकी जपा! तसेच मोफत आरोग्य व कर्करोग निदान शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन अक्कलकोट तालुका युवक मुस्लिम समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

हे कार्य कोणत्याही स्वार्थासाठी नाही

फक्त एका माणसाचा जीव वाचावा, रक्ताच्या कमतरतेमुळे कोणाचाही उपचार थांबू नये आणि कोणत्याही कुटुंबावर आपल्या व्यक्तीला गमावण्याची वेळ येऊ नये, या एकमेव म ाणुसकीच्या भावनेतून हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

**दोन वेगवेगळे सोहळे होणार एकाच छताखाली**

**माढा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन**

# स्वेरीत रविवारी होणार 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार सोहळा'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर व माळशिरस तसेच सांगोला व मंगळवेढा या तालुक्यांतील संस्था, शाळा, महाविद्यालय तसेच शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी यांचा रविवार, दि.२३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता व दुपारी १.३० वाजता स्वेरी मध्ये 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार' सोहळा संपन्न होणार आहे. तरी या चार तालुक्यांसाठी होणाऱ्या दोन्ही सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आ- वाहन 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार सो- हळा' च्या नियोजन समितीच्या वतीने केले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन, माढा विधानसभा मतदार संघाचे आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) मधील स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट व खेड (ता. उत्तर सोलापूर) मधील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या वतीने आयोजिलेला 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार वितरण सोहळा' उद्या रविवार दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न होणार आहे. सकाळी ९:०० वाजता पंढरपूर व माळशिरस तालुक्याकरिता तर दुपारी ०१:३० वाजता सांगोला व मंगळवेढा तालुक्याकरिता अशा दोन सत्रात हा 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार सोहळा' संपन्न होणार आहे. पंढरपूर व माळशिरस तालुक्यांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सिनेट, मॅनेजमेंट कौंन्सील स्थायी समिती पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोल- ापूर विद्यापीठ, सोलापूरच्या सदस्या, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील प्रतिष्ठाण, शंकरनगर- अकलूजच्या अध्यक्षा आणि




उच्च शिक्षण संस्थाचालक सेवाभावी संस्था, सोलापूरच्या अध्यक्षा श्रीमती पद्मजादेवी मोहिते-पाटील तसेच महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघ म हामंडळ, मुंबईचे अध्यक्ष सुभाषराव माने, श्रीराम शिक्षण संस्था, पानीवचे अध्यक्ष प्रकाश पाटील, दि सासवड माळी शुगर फॅक्टरी, माळीनगरचे माजी चेअरमन राजेंद्र गिरमे, पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरपूरचे सचिव सुधीर पटवर्धन, सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शहाजीराव देशमुख, पंचायत समिती माळशिरसचे माजी सदस्य रणजितसिंह जाधव आदी उपस्थित राहणार आहेत तर याचे अध्यक्षस्थान पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे हे भूषविणार आ- हेत. दुपारी १.३० वाजता होणाऱ्या दुसऱ्या सत्रात सांगोला व मंगळवेढा तालुक्यासाठी होणाऱ्या कार्यक्रम ासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंगळवेढ्यातील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुजित कदम, शाहू शिक्षण संस्था, पंढरपूरचे सचिव अभिजीत ढोबळे, सांगोला पंचायत समितीचे सभापती बाळास- ाहेब काटकर, लक्ष्मी शिक्षक प्रस- ारक मंडळ, मंगळवेढाचे संस्थापक अभियंता बजरंग दत्तू व राजुरी (ता. सांगोला) चे गुरुकुल विद्यापीठ व ज्यु. कॉलेज चे संस्थापक महादेव बाड हे लाभले आहेत तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्याविकास मंडळ, मंगळवेढाचे अध्यक्ष राहुल शहा हे असणार आहेत. या दोन्ही सोहळ्याचे समन्वयक म्हणून श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) या संस्थेचे संस्थापक, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य तसेच खेड (ता. उत्तर सोलापूर) येथील स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एस.व्ही.आय.टी.) चे अध्यक्ष डॉ. बी. पी. रोंगे हे असणार आहेत. तरी या दोन्ही कार्यक्रमाना उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समिती, स्वेरी, पंढरपूर व एस. व्ही. आय.टी., सोलापूर यांनी केले आहे. या 'ज्ञानयात्री आदर्श पुरस्कार सोहळ्या'साठी सर्व तयारी पूर्ण झाली असल्याचे दिसून येत आहे.